# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०३,२२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail :- desk16.dte@gmail.com Internet :- http//www.dte.org.in


क्रमांक : १६/आस्था/माहिती अधिकार/२०१५/२२६

दिनांक : २८/११/२०१५

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभाग कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर,

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मंबई,

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत....

संदभ:-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र
क्र. माअअ-२०१५/प्र.क्र.१९९/१५/आस्था-२, दिनांक २/११/२०१५.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१५/ प्र.क्र.(२२१/१५)सहा.
दिनांक २६.१०.२०१५.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१५/ प्र.क्र./१२१/१५/(सहा), दिनांक २६.१०.२०१५ यासोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत च्या सूचना आपल्या विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थाच्या निदर्शनास आणाव्यांत.

विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 6651 दिनांक 01/12/15

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-
१) श्रीम. शीतल रा. कदम, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.३२. यांना माहितीसाठी सादर.
२) सर्व अपिलीय अधिकारी, जनमाहिती अधिकारी, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

क्रमांक-विकाअ/आस्था/माअधि/१५/३००
दिनांक - 5 DEC 2015

प्रति,
प्र. शा. शिक्षि. महा. अमरावती / शा. ऑ. महा. ...
प्राचार्य, शा. निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ
प्राचार्य, शा. तंत्रनिकेतन अमरावती / यवतमाळ / खामगांव / वाशिम / मुर्तिजापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
प्रत :- ग्रंथपाल, तंत्रशिक्षण वि.का. अमरावती.

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

**महाराष्ट्र शासन**

अतितात्काळ

क्रमांक: माअअ-२०१५/प्र.क्र.१९९/१५/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
रु.नं.४३१(विस्तार), ४ था माळा, मंत्रालय, मुंबई-३२.
E-mail-htedest@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८५५७६६
दिनांक: ०२ नोव्हेंबर, २०१५.

प्रति,

उप सचिव,
(महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/कला/ग्रंथालये/तंत्र शिक्षण),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

संचालक,
(तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/कला/ग्रंथालय),
संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

विषय: माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या अंमलबजावणीबाबत.
संदर्भ:- सामान्य प्रशासन विभागाचे दि. २६.१०.२०१५ रोजीचे माहिती अधिकार शासन परिपत्रक.

संदर्भाधीन सामान्य प्रशासन विभागाचे माहिती अधिकार शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र./१२१/१५/(सहा), दि. २६.१०.२०१५ यासोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन परिपत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावे, ही विनंती.

(शीतल रा. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

2015

३०६५५
५.११.१५

Renuka-Letters

१८३८/अ-२
३१/१०/१५

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीबाबत

कक्ष व तंत्र
कार्यासन ३१/१०/१५-२
दिनांक २०/१०/१५
8665
30/10/15

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२८/१५) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २६.१०.२०१५.

पहा- मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. २.७.२०१५ चे आदेश.

परिपत्रक:-

माहिती अधिकारातील अनेक प्रकरणात अर्जदारांनी अभिलेख तपासण्याची मागणी केलेली नसतानाही अर्जदारांना कार्यालयात अभिलेख तपासण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांकडून बोलाविले जाते. त्यांच्याकडे कागदपत्राचे गठ्ठे देऊन त्यांना माहिती शोधण्यास सांगण्यात येते अशी तक्रार श्री. शैलेश गांधी यांनी मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे दि.२१.१.२०१५ रोजी केली होती. या प्रकरणी आवश्यक सूचना देणारे परिपत्रक सर्व शासकीय कार्यालयासाठी निर्गमित करावे असे आदेश मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार दि. २.७.२०१५ रोजी दिले आहेत. या अनुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सूचित करीत आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्जदाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरूपाची (voluminous) नसेल तर अर्जदारास कार्यालयात अभिलेख तपासण्यासाठी बोलाविण्यात येऊ नये. अशा प्रकरणात अर्जदाराने मागीतलेली माहिती, अर्जदारास विहित शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावी.

३. अर्जदाराने मागणी केलेली माहिती फारच व्यापक (voluminous) स्वरूपाची असेल तर ती पाहण्याची व तपासण्याची संधी देऊन अर्जदारास आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती विहित शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावी.

४. अर्जदाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरूपाची (voluminous) असेल तर किंवा त्याने अभिलेख तपासणीसाठी अर्ज केलेला असेल अशावेळी अर्जदारास अभिलेख तपासण्यास बोलाविण्यापूर्वी त्या अभिलेख्यांची एक निर्देशसूची तयार करावी व संबंधीत धारिकेतील पृष्ठांना क्रमांक देण्यात यावेत. अर्जदारास अभिलेख तपासण्यास बोलाविताना सोयीची वेळ तसेच तीन तारखा कळविण्यात याव्यात. सदर वेळ वा तारखा अर्जदारास सोयीची नसल्यास त्याला संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यास संपर्क करण्यास कळविण्यात यावे.

श्री. ... 31-10-15

५. अर्जदार अभिलेख तपासण्यासाठी येणार असलेल्या दिनांकास संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यास महत्वाच्या

पुढील पृष्ठावर..........

कारणास्तव कार्यालयाबाहेर जावे लागणार असल्यास त्याने त्याच्या सहकारी अधिकारी किंवा अधिपत्याखालील कर्मचाऱ्याकडे अभिलेख तपासणीसाठी देण्याची जबाबदारी सोपवावी.

६. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

७. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१४१०२६१५११३३१००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.शि.अरवारी)
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह)
सर्व विभागीय आयुक्त
महासंचालक, यशदा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा.

*पत्राने